सागरी पक्षी

अल्बर्ट

लेखक: सिड

मराठी: अश्विनी बर्वे



अल्बर्ट, अल्बर्ट हा एक पक्षी होता.तो समुद्रावर राहायचा. तो एक अल्बाट्रॉस होता. नाविकांना तो आवडत असे, अल्बाट्रॉस दिसणे हे शुभशकुन मानले जाते.

सागरी पक्षी

अल्बर्ट

लेखक: सिड
मराठी: अश्विनी बर्वे

अल्बर्ट एक प्रचंड सागरी गरुड होता.
इंग्रजी मध्ये त्याला अल्बाट्रॉस म्हणतात.

जेव्हा अल्बर्ट त्यांच्या जहाजाच्या मागोमाग जाई,

तेव्हा ते आनंदी होत असे.

एक दिवस समुद्रात भयानक वादळ झाले.
वारे सतत वाहतच होते.

खलाश्यांना अल्बर्ट कुठेच दिसला नाही.

अल्बर्टला पण खलाशी दिसले नाहीत.

अल्बर्टला समोर फक्त जमीन दिसत होती.



तू कधी समुद्र पाहिला आहे का?
अल्बर्टने पिंजऱ्यातल्या पक्ष्याला विचारले.

तो एक पोपट होता.
“पॉलीला एक बिस्किट पाहिजे” पोपट म्हणाला.

“तू समुद्र पाहिला आहे का?
अल्बर्टने घड्याळ्यातल्या पक्ष्याला विचारले.

ती एक कोकिळा होती.
तिने फक्त "कुकुकु, कुकुकु केले.

“तू समुद्र पाहिला आहे का?”
अल्बर्टने झाडावरील पक्ष्याला विचारले.

तो एक सुतार पक्षी होता.
"टक-टक-टक," करत
सुतारपक्ष्याने उत्तर दिले.

“तू समुद्र पाहिला आहे का?
अल्बर्टने चर्चवर बसलेल्या पक्ष्याला विचारले.



तो पत्र्याचा बनवलेला पक्षी होता.
त्याने काहीच उत्तर दिले नाही.

मग अल्बर्ट उडत एका टोपीच्या दुकानात गेला.

“मला सागरीप्रवासासाठी पक्ष्याची ही टोपी पाहिजे” एका श्रीमंत स्त्री म्हणाली.

“किती सुंदर टोपी आहे," त्या स्त्रीला तिचे मित्र म्हणाले. टोपीवरील पक्षी अगदी खरा वाटतो आहे.

“धन्यवाद” ती स्त्री म्हणाली. “मी ही टोपी जहाजावर घालणार आहे.

नंतर प्रवासी जहाजावर चढले.
त्यांनी एकमेकांना अच्छा केले.

"अलविदा," ती स्त्री म्हणाली.

मग दुपारच्या जेवणाची वेळ झाली.
“मी तुला ओळखतो,” कॅप्टन म्हणाला.
“नाही, मी तुम्हाला ओळखत नाही.”
ती स्त्री म्हणाली.

“तुम्हाला नाही,” कॅप्टन म्हणाला,
“तुमच्या टोपीवर बसलेल्या पक्ष्याला म्हणत आहे.”

“ओहो,मला माझ्या टोपीवर खरा
पक्षी नको आहे.” ती ओरडत म्हणाली.

“पण आम्हाल तो खरा पक्षी हवा आहे.”
जहाजावरील खलाशी म्हणाले.
तो सागरी गरुड आमच्यासाठी शुभ आहे.

“तुम्ही मला भेटलात हे खूप चांगलं झालं,"
अल्बर्ट खलाशांना म्हणाला.

“जहाजजावर तुझे स्वागत आहे अल्बर्ट,"
सर्व खलाशी एकत्र म्हणाले.



समाप्त